महा मेट्रो

PUNE METRO

## शिवाजीनगर येथील मातोश्री रमाबाई आंबेडकर चौकचे मेट्रो कामादरम्यान नूतनीकरण



REDEVELOPMENT OF BUS STATION AS A BUS PORT AT SHIVAJINAGAR, PUNE

पुणे, ३ जुलै २०१९: पुणे मेट्रोच्या कृषी महाविद्यालय ते स्वारगेट हा ५ किमीचा टप्पा भुयारी असून शिवाजीनगर बस स्थानकाखाली पुणे मेट्रोचे शिवाजीनगर मेट्रो स्थानक असणार आहे . पुणे मेट्रोची शिवाजीनगर स्थानक मल्टिमोडल हब च्या धर्तीवर बांधण्यात येणार असून एस. टी. बस , पीएमपीएमएल बस , शिवाजीनगर रेल्वे स्थानक यांना मेट्रो स्थानकांद्वारे जोडण्यात येणार आहे . मेट्रो स्थानकांवर प्रवाशांना सहजगत्या जाण्यासाठी शिवाजीनगर बस स्थानक, आकशवाणी केंद्र, (सिमला ऑफिस चौक) , पुणे रेल्वे स्थानक ही ठिकाणे भुयारी मार्गांनी जोडण्यात येणार आहे . पुणे मेट्रो कॉमन मोबिलिटी कार्ड अंमलात आणणार असून त्यामुळे पीएमपीएमएल, रेल्वे व एस. टी. बस साठी वेगळे तिकीट घेण्याची गरज पडणार नाही.



REDEVELOPMENT OF BUS STATION AS A BUS PORT AT SHIVAJINAGAR, PUNE

शिवाजीनगर मेट्रो बस स्थानकाचे निर्माण कामादरम्यान स्थानकाजवळील संपूर्ण परिसर विकसित करण्यात येणार आहे . अंत्यत मोक्याच्या मातोश्री रमाबाई आंबेडकर चौक संपूर्णतः नूतनीकरण करण्यात येणार आहे . त्यामुळे या भागातील ट्रॅफिक कंजेक्शन कमी होईल व पार्किंग, सायकल ट्रॅक, पदपथ, ऑटो रिक्षा पार्किंग, इत्यादी अनेक गोष्टींचे व्यवस्थित नियोजन होणार आहे . मातोश्री रमाबाई आंबेडकर चौकात ३२.३२ मी. व्यासाचे मध्यवर्ती भाग सुशोभित करण्यात येणार आहे. त्यामुळे त्या भागातील वाहतूक व्यवस्थेत आमूलाग्र बदल होणार आहे.



REDEVELOPMENT OF BUS STATION AS A BUS PORT AT SHIVAJINAGAR, PUNE